Order-

Issue suit summons to the defendant to appear and answer the claim by filing Written Statement of his defence, if any, within 30 days from date of service of summons and for settlement of issues and to produce all documents in his possession of power, vide VIII Rule 1 & 1A of the Code of Civil Procedure, 1908.

Sd/-

Radhanagari. (N. P. Kakade)

Date : 02/07/2026 Jt. Civil Judge Junior Division,

Exh.1 रे. क. नं. 105/२०२६

## मे. दिवाणी न्यायाधिश सो, क. स्तर, राधानगरी

**यांचे कोर्टात...**

श्री. रविंद्र बाळू हातकर
व. व. ५४, धंदा : शेती,
रा. फराळे पैकी डवरवाडी ,
ता. राधानगरी, जि. कोल्हापूर. } वादी

विरूध्द

१. श्रीमती मंगल महेश हातकर
व. व. ५६, धंदा : शेती,
रा. रा. फराळे पैकी डवरवाडी ,
ता. राधानगरी, जि. कोल्हापूर } प्रतिवादी

Assistant Superintendent

२. श्री. शांताराम महेश हातकर
व. व. ३१, धंदाः शेती,
रा. फराळे पैकी डवरवाडी ,
ता. राधानगरी, जि. कोल्हापूर.
३. श्री. अजित महेश हातकर
व. व. २९ , धंदा :,
रा. फराळे पैकी डवरवाडी ,
ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

} प्रतिवादी

**दावा वाटपासाठी, कोर्ट फी साठी**
**दावा रू. १,०००/— व**
**ज्युरिसडिक्शनसाठी दावा रू. १,०००/—**

<u>यातील वादी मे. कोर्टाना नम्रपणे कळवितात की,</u>


<u>१. दावा मिळकतीचे वर्णनः</u>

मौजे लिंगाचीवाडी , ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथील भुमापन गट नं. ५२/१ एकुण क्षेत्र हे. ०.६२.८० आर आकार रुपये ५.६२ पैसे पैकी वादी यांचा ½ हिस्सा

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत या दावेचा विषय असून त्यांस यापुढे संक्षिप्तरित्या 'दावा मिळकत' असे संबोधणेत आले आहे.

२. यातील वादी व प्रतिवादी यांची नाते दर्शविणारी वंशावळ खालीलप्रमाणेः

Assistant Superintendent,




येणेप्रमाणे वादी व प्रतिवादी यांची वंशावळ असे.

२. वादी व प्रतिवादी नं. १ यांचे पती महेश हे सख्खे भाऊ असून महेश हे दि. ०१.१०.१९९९ इ. रोजी मयत आहेत. तसेच वादी यांचे वडिल बाळू केदारी हालकर हे देखील दि. २४.०७.२००३ इ.रोजी मयत आहेत. वादी यांची प्रथम आई लक्ष्मी हया देखील दि. १०.०८.२०२५ इ.रोजी मयत आहेत व द्रौपदी हया दि. १३.०४.२००२ इ. रोजी मयत आहेत . प्रतिवादी हे वादी यांचे मयत भाऊ महेश यांचे सरळ वारस आहेत.

३. यातील वादी व प्रतिवादी नं. १ यांच्या बहिणी शारदा साताप्पा पाटील व पुष्पा अशोक पाटील यांनी दावा मिळकतीतील त्यांचा असलेला हिस्सा वादी व प्रतिवादी यांचे हिस्सेत र.द.नं. १६६९ ने दि. ३०.१०.२०१८ इ. रोजी सोडून दिलेला असलेमुळे त्यांना सदरकामी पक्षकार केलेले नाही.

५. यातील प्रतिवादी नं. १ हया वादींचे मयत भाऊ महेश यांची पत्नी असून प्रतिवादी नं. २ व ३ ही प्रतिवादी नं. १ यांची मुले आहेत. दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांच्या नावे नोंद आहेत.

६. दावा अर्जी कलम १ मध्ये नमुद केलेल्या दावा मिळक्ती हया वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जित मिळक्ती असून दावा मिळक्तींमध्ये वादी व प्रतिवादी हे समाईक्मणे समजूतीने वहीवाटी करत आलेले आहेत. दावा

Assistant Superintendent

जमीनीचे वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. असे असताना यातील प्रतिवादी हे वादीना दावा मिळक्तीमध्ये वहीवाट करणेस अडथळा निर्माण करत आहेत. दावा मिळक्तीस वादी व प्रतिवादी यांची नावे समाईकामध्ये नोंद असलेमुळे प्रतिवादी हे वादीना दावा मिळकतीमध्ये कष्ट मशागत करणेसाठी तसेच भात, ऊस अशी पिके घेणेसाठी अडथळा निर्माण करतात. दि. १५.०६.२०२६ इ. रोजी वादी हे दावा मिळकतीमध्ये गेले असता प्रतिवादी नं. १ तेथे आल्या व वादीना कष्ट मशागत करणेसाठी हरकत अडथळा करून दावा मिळक्तीशी तुमचा काहीएक संबंध नाही, येथे पुन्हा यायचे नाही, अशी धमकी दिली त्यानंतर यातील वादी यांनी गावातील मध्यस्थी लोकांकरवी प्रतिवादी यांना बोलवून घेवून दावा जमीनी सरसनिरस मानाने वाटून घेणेबाबत विचारणा केली असता प्रतिवादी यांनी वादीस दावा मिळक्ती वाटून घेणेबाबत स्पष्टपणे नकार दिला. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी विरूध्द दावा मिळक्ती सरसनिरस मानाने तुटक वाटप होवून मिळणेबाबत सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

**<u>७. दावेस कारणः</u>**

दि. १५.०६.२०२६ इ. रोजी वादी हे दावा मिळकतीमध्ये गेले असता प्रतिवादी नं. १ तेथे आल्या व वादीना कष्ट मशागत करणेसाठी हरकत अडथळा करून दावा मिळक्तीशी तुमचा काहीएक संबंध नाही, येथे पुन्हा यायचे नाही, अशी धमकी दिली त्यानंतर यातील वादी यांनी गावातील मध्यस्थी लोकांकरवी प्रतिवादी यांना बोलवून घेवून दावा जमीनी सरसनिरस मानाने वाटून घेणेबाबत विचारणा केली असता प्रतिवादी यांनी वादीस दावा मिळक्ती वाटून घेणेबाबत स्पष्टपणे नकार दिला. तेव्हा व त्यानंतर वेळोवेळी दाव्यास कारण घडले आहे.

Assistant Superintendent

<u>८. दाव्याचा तपशिलः</u>

| रू | पैसे | |
|---|---|---|
| १,०००.०० | | दावा मिळकतीच्या एकूण आकाराची ८० पट करून वादीच्या १/२ हिस्सेची किंमत सदरी दाखल. |
| १,०००.०० | | एकूण किंमत. |

<u>९. दाव्याची आकारणीः</u>

दाव्याची आकारणी कोर्ट फी साठी रक्कम रू. १,०००/– व ज्युरिसडिक्शनसाठी रक्कम रू. १,०००/– करून बॉम्बे कोर्ट फी ॲक्ट कलम ६(iv) (J) शेडयुल II रूल २३ फ कलम ६ प्रमाणे योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावलेला आहे.

१०. दावा मिळकती या मे. कोर्टाच्या स्थलसिमेत येत असलेने प्रस्तुतचा दावा चालवून निकाली करणेचा अधिकार या मे. कोर्टाना आहे.

११. प्रस्तुतचा दावा मुदतीत आहे.

१२. वादी, प्रतिवादीपैकी कोणीही विकलांग नाही.

१३. दावा मिळकतीबाबत अन्य कोणत्याही कोर्टात वाद प्रलंबित नाही.

<u>१४. सबब वादीची विनंती की,</u>

अ) वादीचा दावा मंजूर करणेत यावा.

ब) दावा मिळकतीतील वादीचा १/२ हिस्सा अगर मे. कोर्ट जो ठरवतील तो हिस्सा प्रतिवादीकडून सरसनिरस मानाने वाटप होवून वादीचे प्रत्यक्ष कब्जेत मिळावा.

ब) वादीचा या दावेचा कोर्ट खर्च प्रतिवादीकडून वसूल होवून मिळावा.

Assistant Superintendent

क) जरूर पडलेस दावा दुरूस्ती करणेस परवानगी असावी.

ड) इतर अनुषंगिक हुकूम याच कामी वादीचे बाजूने मिळाव्यात.

येणेप्रमाणे दावा असे.

सोबत वकीलपत्र, पत्तामेमो, कागदयादी, यादीप्रमाणे कागद नक्कला जोडलेल्या आहेत.

राधानगरी

दि. २२.०६.२०२६

Drafted and presented by
Adv. V. B. Patil

## प्रतिज्ञा

मी यातील वादी श्री. रविंद्र बाळू हातकर व. व. ५४, धंदा : शेती, रा. फराळे पैकी डवरवाडी ता. राधानगरी, जि. कोल्हापूर आज मुक्काम राधानगरी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील नमुद दावेतील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी

रविंद्र बाळू हातकर

दि.२२.०६.२०२६

## ॲफिडेव्हीट

मी यातील वादी श्री. रविंद्र बाळू हातकर व. व. ५४, धंदा : शेती, रा. फराळे पैकी डवरवाडी ता. राधानगरी, जि. कोल्हापूर आज मुक्काम राधानगरी देवाची शपथेवर कथन करतो की, वरील नमुद दावेतील संपूर्ण मजकूर

Assistant Superintendent

माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट असे.

राधानगरी

दि.२२.०६.२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

(ॲड. व्ही.बी. पाटील)

**प्रतिज्ञा**

मी यातील वादी श्री. रविंद्र बाळू हातकर व. व. ५४, धंदा : शेती, रा. फराळे पैकी डवरवाडी ता. राधानगरी, जि. कोल्हापूर आज मुक्काम राधानगरी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील नमुद दावेतील व ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी

दि. २२.०६.२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. Ravindra Balu Hatkar.
Age 54 Occu. Agri
of Farale paiki Dawarwadi, Tal. Radhanagari
Who identified by Shri./Smt. V. B. Patil.
Adv. Whom I Know personally
Dated 22/6/2026

Assistant Superintendent